| | | |
|---|---|---|
| | **हिंजवडी वाहतुक विभाग**<br>**पिंपरी चिंचवड, पोलीस आयुक्तालय**<br>**भुजबळ चौक.** | |
| **जा.क्र./हिंजवडी वाहतुक विभाग/ ९०९७९० /२०२४, पिंपरी चिंचवड** | | **दिनांक:- १८/०४/२०२४** |

प्रति,

मा.पोलीस उप-आयुक्त सो,
वाहतूक शाखा, पिंपरी-चिंचवड.

यांना सविनय सादर

प्रतिवेदक :- एम.के.आदलिंग सहा.पोलीस निरीक्षक, हिंजवडी वाहतूक विभाग, पिंपरी चिंचवड

**विषय :- दिनांक २३/०४/२०२४ रोजीचे हिंजवडी येथील श्री.ग्रामदैवत म्हातोबा देवाचे यात्रेनिमित्त बगाड अनुषंगाने वाहतुक डायव्हर्शन आदेश निर्गमित होणेबाबत..**

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये सविनय सादर की, दिनांक २३/०४/२०२४ रोजी हिंजवडी येथील श्री.ग्रामदैवत म्हातोबा देवाची यात्रा भरणार असुन नमुद यात्रेत दुपारी १६.०० वाजता पारंपारिक बगाड मिरवणुक असल्याने बगाड मिरवणुकीत सुमारे ३० हजार ते ४० हजार भाविक उपस्थित असणार आहेत. बगाड मिरवणुकीला कोठेही अडथळा होवु नयेत याकरिता हिंजवडी वाहतूक विभागा अंतर्गत महत्वाचे ठिकाणी वाहतुक डायव्हर्शन करणे आवश्यक असल्याने वाहतुकीचा पर्यायी मार्ग खालील प्रमाणे असणार आहे.

**१.टाटा टी चौक ते वाकड नाका :-**

**पर्यायी मार्ग-** विप्रो सर्कल फेज ०२ चौकाकडुन शिवाजी चौक मार्गे वाकड नाका कडे जाणारी वाहतुक टाटा टी जंक्शन चौक येथुन लक्ष्मी चौक- भुमकर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**२.जॉमेट्रीक सर्कल ते वाकड नाका :-**

**पर्यायी मार्ग-** जॉमेट्रीक सर्कल चौकाकडुन शिवाजी चौक मार्गे वाकड नाका कडे जाणारी वाहतुक ही मेझा-९ चौकातुन डावीकडे वळुन लक्ष्मी चौक- भुमकर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**३.शिवाजी चौक ते भुमकर चौक :-**

**पर्यायी मार्ग-** शिवाजी चौक कडुन कस्तुरी चौक मार्गे भुमकर चौकाकडे जाणारी वाहतुक इंडियन ऑईल चौक मार्गे वाकड गाव येथुन इच्छित स्थळी जातील.

**४.इंडियन ऑईल चौक ते विनोदे वस्ती चौक :-**

**पर्यायी मार्ग-** इंडियन ऑईल चौकाकडुन कस्तुरी चौक मार्गे विनोदे वस्ती व हिंजवडी गावठाणकडे जाणारी वाहतुक शिवाजी चौक व वाकड गाव मार्गे इच्छित स्थळी जातील.

**५.इंडियन ऑईल चौक ते वाकड नाका, सयाजी अंडरपास-**

**पर्यायी मार्ग-** इंडियन ऑईल चौक मार्गे वाकड नाका, सयाजी अंडरपासकडे जाणारी वाहतुक वाकड ओव्हर ब्रिजवरुन /वाकड गाव मार्गे इच्छित स्थळी जातील.

**६.मुळा नदी ब्रिज पंक्चर ते वाकड नाका (भुजबळ चौक)**

**पर्यायी मार्ग-** मुळा नदी ब्रिज पंक्चर येथुन सर्व्हिस रोडने वाकड गाव व हिंजवडी कडे जाणारी वाहतुक हायवेने सरळ भुमकर चौक मार्गे इच्छित स्थळी जातील.

**७. मारुजी वाय जंक्शन ते कस्तुरी चौक व शिवाजी चौक जाण्यास बंदी.**

**पर्यायी मार्ग-** भुमकर चौक येथुन येणारी वाहतुक सरळ पुढे कस्तुरी चौकाकडे न जाता मारुंजी वाय जंक्शन येथे उजव्या बाजुला वळुन विनोदे वस्ती मार्गे लक्ष्मी चौक व पुढे इच्छित स्थळी जातील.तसेच विनोदे वस्ती येथुन कस्तुरी चौक सरळ पुढे इंडीयन ऑईल चौक मार्गे शिवाजी चौकाकडे जातील.

तरी हिंजवडी येथील श्री. ग्रामदैवत म्हातोबा देवाची यात्रा (बगाड) अनुषंगाने दिनांक २३/०४/२०२४ रोजी दुपारी १२.०० वाजता ते २२.०० वाजता पर्यत वाहतुकीत वरील प्रमाणे बदल करण्याकरिता नोटीफिकेशन काढणेस विनंती आहे.

**मा.सा.व्हावे**

(एम.के.आदलिंग)
सहा.पोलीस निरीक्षक
हिंजवडी वाहतुक विभाग पिंपरी चिंचवड